# दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा

मुख्य कार्यालय :- सि.स.नं.५२३ ब, सदरबझार,
अण्णासाहेब कल्याणी विद्यालय परिसर, सातारा - ४१५ ००१
फोन नं.(०२१६२) २३१३१३, २३१३१४, २३१८३५, २३३३१५
E-mail – ho@rsbs.co.in


जा.क्र. :- ६३८ /प्रशासन/२०२३-२४ दि.१७/०७/२०२३

## * परिपत्रक क्र.२ *

बँकेच्या कामकाजासंबंधी सर्व **सभासद बंधू-भगिनींच्या माहितीसाठी खालीलप्रमाणे माहिती** कळवित आहोत.

## १) सभासदांच्या गुणवंत मुला/मुलींची माहिती पाठविणेबाबत :-

बँकेच्या वर्धापनदिनानिमित्त बँक सभासदांच्या विशेष गुणवत्ताधारक मुला-मुलींचा तसेच विशेष प्राविण्य मिळालेल्या बँक सभासदांचा सत्कार समारंभ आयोजित करणेत येणार आहे. सन् २०२१-२२ व सन् २०२२-२३ या दोन शैक्षणिक वर्षातील गुणवत्ताधारक विद्यार्थी / विशेष प्राविण्य प्राप्त सभासद यांचे निकष व त्यांना बँकेमार्फत बक्षीस, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्याची नियमावली खालीलप्रमाणे -

१) इ.५ वी व ८ वी च्या स्कॉलरशीपच्या परीक्षेमध्ये शासकीय शिष्यवृत्ती मिळवून राज्यस्तरीय यादीत येणारा सभासदाचा मुलगा अगर मुलगी. (इ.५ वी व इ.८ वी च्या माहितीसोबत महाराष्ट्र शासनाच्या शिष्यवृत्ती प्राप्त उत्तीर्ण विद्यार्थ्यांची अधिकृत यादीची प्रत पाठविणे आवश्यक आहे. )

२) शासकीय चित्रकला एलिमेंट्री किंवा इंटरमिजीएट परीक्षेत ‘अ’ श्रेणीत उत्तीर्ण झालेला सभासदाचा मुलगा अगर मुलगी.

३) एस्.एस्.सी. (१० वी) मध्ये सरासरी गुण शेकडा ८० टक्के अगर त्यापेक्षा जास्त गुण मिळविलेला सभासदाचा मुलगा अगर मुलगी.

४) एच्.एस्.सी. (१२ वी) शास्त्र व व्यवसाय शिक्षणामध्ये शेकडा ८० टक्के अगर त्यापेक्षा जास्त गुण मिळविलेला तसेच सीईटी परीक्षेत ८५% पर्सेनटाईल किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविलेला, जे.ई.ई.परीक्षेत ७०% पर्सेनटाईल किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविलेला, एन.ई.ई.टी. परीक्षेत ४०० किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविलेला तसेच आय.आय.टी. मध्ये प्रवेश मिळविलेला सभासदाचा मुलगा अगर मुलगी.

५) एच्.एस्.सी. (१२ वी) कला मध्ये सरासरी शेकडा ७५ टक्के अगर त्यापेक्षा जास्त गुण मिळविलेला सभासदाचा मुलगा अगर मुलगी.

६) एच्.एस्.सी. (१२ वी) वाणिज्य मध्ये सरासरी शेकडा ८० टक्के अगर त्यापेक्षा जास्त गुण मिळविलेला सभासदाचा मुलगा अगर मुलगी.

७) बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी, एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी, बी.सी.एस्., बी.सी.ए., बी.बी.ए, एम.सी.ए, एम.सी.एस., डी.एड्., बी.एड्., एम्.एड्., एल.एल.बी., एल.एल.एम., डी.बी.एम्., एम्.बी.ए., बी.फार्म, एम.फार्म, इंजिनिअरिंग व मेडिकल मध्ये गुणानुक्रमे विद्यापीठात एक ते तीन नंबर येणारा / अंतिम वर्षाच्या परीक्षेत कोणत्याही विषयात प्रथम येणारा सभासदाचा मुलगा अगर मुलगी.

--कृ.मा.प.--

८) एमटीएस् (महाराष्ट्र टॅलेंट सर्च) / एनटीएस् (नॅशनल टॅलेंट सर्च), एन.एम.एम.एस. (नॅशनल मिन्स कम मेरिट स्कॉलरशीप) परीक्षेत उत्तीर्ण झालेला सभासदाचा मुलगा अगर मुलगी.

९) एम्.पी.एस्.सी. / यु.पी.एस्.सी. परीक्षा उत्तीर्ण झालेला, आय.बी.पी.एस., आय.बी.पी.एस. (एस.बी.आय), आर.आर.बी. (रिजनल रुरल बँक), एल.आय.सी., जी.आय.सी. या परीक्षेमधून वर्ग १ किंवा समकक्ष मध्ये निवड झालेला सभासदाचा मुलगा अगर मुलगी अगर सभासद.

१०) राज्य / राष्ट्रीय स्तरीय इन्स्पायर अॅवॉर्ड मिळालेला सभासदाचा मुलगा अगर मुलगी.

११) एम.डी. / एम.एस.(अभियांत्रिकी व वैद्यकीय) / सी.ए. / सी.एस. / पीएच.डी. पदवी संपादित केलेला, विदेशात पोस्ट डॉक्टरल रिसर्चसाठी निवड झालेला सभासदाचा मुलगा अगर मुलगी अगर सभासद

१२) सर्व खेळांमध्ये **राष्ट्रीय पातळीवर** सहभागी झालेला सभासदाचा मुलगा अगर मुलगी.

१३) राज्य शासनाकडून किंवा केंद्र सरकारकडून मिळालेला आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सभासद व विद्यापीठाकडून दिला जाणारा आदर्श शिक्षक / प्राध्यापक पुरस्कार प्राप्त सभासद.

वरीलपैकी अ.नं.१ ते १२ हे निकष पूर्ण करणाऱ्या सभासदांच्या मुलास / मुलीस बँकेमार्फत रोख पारितोषिक, प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व गुलाबपुष्प देऊन त्यांचा गौरव करणेत येणार आहे.

तसेच अ.नं.१३ चा निकष पूर्ण करणाऱ्या बँकेच्या सभासदांचा बँकेमार्फत शाल, सन्मानचिन्ह व पुस्तक देवून त्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

त्यानुसार आम्ही आपणांकडून सन् २०२१-२२ व सन् २०२२-२३ या दोन शैक्षणिक वर्षात वरील परीक्षेमध्ये विशेष प्राविण्य मिळालेल्या बँकेच्या सभासदांच्या मुलांची अगर मुलींची माहिती तसेच बक्षीसपात्र सभासदांची विहित नमुन्यात माहिती मागवित आहोत.

तरी आपण बँकेच्या सभासदांच्या गुणवंत मुलांची-मुलींची तसेच सभासदांची माहिती पाठविताना वरील निकष विचारात घेवून माहिती पाठवावी, ही विनंती.

वरीलप्रमाणे विद्यार्थ्यांची नांवे कळविताना महाराष्ट्रामधील सर्व एस्.एस्.सी., एच्.एस्.सी.बोर्ड व मान्यताप्राप्त विद्यापीठे विचारात घ्यावीत.

## २) गरीब, निराधार व अनाथ मुलांच्या मदतीसाठी माहिती पाठविणेबाबत :-

आपल्या बँकेच्या वर्धापन दिन कार्यक्रमाचे वेळी बँकेमार्फत सभासदांच्या गुणवंत मुला-मुलींस विविध स्वरुपात भेट दिली जाते. परंतु जे विद्यार्थी/ विद्यार्थिनी रयत शिक्षण संस्थेत शिक्षण घेत आहेत परंतु आई-वडिलांविना पोरके झालेले आहेत, ज्यांची आर्थिक परिस्थिती अतिशय गरिबीची व हलाखीची आहे असे विद्यार्थी / विद्यार्थिनी केवळ सुविधा प्राप्त होत नसलेने विशेष नैपुण्य मिळवू शकत नाहीत. आर्थिकदृष्टया गरीब विद्यार्थी / विद्यार्थिनी गुणवंत यादीमध्ये नसले तरी त्यांना बँकेमार्फत गतवर्षापासून आर्थिक मदत करणेत येत आहे. याबाबत गरीब विद्यार्थ्यांना अशा प्रकारची मदत देण्याचे निकष व त्यांना बँकेमार्फत मदत देण्याची नियमावली खालीलप्रमाणे -

१. सदरचा विद्यार्थी/विद्यार्थिनी रयत शिक्षण संस्थेत शिक्षण घेत असणे आवश्यक आहे.
२. आई-वडील नसलेला विद्यार्थी / विद्यार्थिनी असणे आवश्यक.
३. अशा प्रकारची मदत--
   - अ) एस.एस.सी. मध्ये उत्तीर्ण झाल्यानंतर इ.११ वी मध्ये प्रवेश घेतलेनंतर रु.२,०००/- देणेत येतील.
   - ब) एच.एस.सी.मध्ये उत्तीर्ण झाल्यानंतर डिग्रीच्या प्रथम वर्गात प्रवेश घेतलेनंतर रु.३,०००/- देणेत येतील.
   - क) पदवीनंतर पदव्युत्तरच्या प्रथम वर्गात प्रवेश घेतलेनंतर रु.५,०००/- देणेत येतील.

--कृ.मा.प.--

४. अशा विद्यार्थी/ विद्यार्थिनीने विविध क्रीडा व इतर स्पर्धेत भाग घेतलेला असावा.
५. अशा प्रकारचा लाभ विद्यार्थी/ विद्यार्थिनीच्या शैक्षणिक कालावधीत फक्त एकदाच मिळणार आहे.
६. अनाथ असलेल्या विद्यार्थ्याचे आई-वडील नसलेचा पुरावा (मयत दाखले) पाठविणे आवश्यक.

**वरील सर्व मुलांची / सभासदांची नांवे पाठविण्यासाठी सोबत आम्ही एकूण अकरा (११) नमुने तक्ते** जोडलेले आहेत. त्या नमुन्यातच ही नांवे / प्रस्ताव पाठवावेत. सदरची नांवे आपल्या शाखा कार्यक्षेत्रातील **बँकेच्या संबंधित शाखेकडे** उशीरात उशीरा दिनांक ०७/०८/२०२३ पर्यंत मिळतील अशा रितीने पाठवावीत. सोबत जोडलेल्या तक्त्यातील **परिपूर्ण** माहिती, विद्यार्थ्याचे / सभासदाचे गुणपत्रक व गुणवत्ता प्रमाणपत्राची प्रमाणित झेरॉक्स प्रत असलेशिवाय नांवाचा विचार केला जाणार नाही.

तरी सदरची नांवे आपल्या शाखा कार्यक्षेत्रातील ***बँकेच्या संबंधित शाखेकडेच पाठविण्यात यावी. मुख्य कार्यालयाकडे पाठविण्यात येऊ नये.*** दि.०७/०८/२०२३ पर्यंत पाठवून बँकेस सहकार्य करावे, ही नम्र विनंती. ***कार्यक्रमाच्या सुयोग्य नियोजनाच्या दृष्टीने मुदतीनंतर येणाऱ्या माहितीचा विचार करता येणार नाही***, याची कृपया नोंद घ्यावी.

**टीप :-**

१) विद्यार्थी / विद्यार्थिनी उत्तीर्ण झालेल्या शाळेचे / महाविद्यालयाचे संपूर्ण नांव सुस्पष्ट व सुवाच्य लिहावे तसेच आपणांशी पत्रव्यवहार करावयाचा झाल्यास आपला पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता पिनकोडसह व पालकाचा (सभासदाचा) मोबाईल नंबर व पालकाचा सभासद नंबर स्पष्ट व बिनचूक लिहिणेत यावा.

सदरचे परिपत्रक आपले शाखेतील सर्व सभासद बंधू-भगिनींच्या निदर्शनास आणावे, ही नम्र विनंती.

''आपले सहकार्य आहेच. ते वृध्दींगत व्हावे, ही सदिच्छा''.

कळावे,

17.07.23

प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी
दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा

मुख्य कार्यालय सातारा

**प्रत माहितीसाठी :-**

१. **मा.चेअरमन सो / व्हा.चेअरमनसो, सर्व संचालकसो, सर्व संचालिकासो**
दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा
२. **मा.असि.जनरल मॅनेजरसो, विभागप्रमुखसो,**
दि रयत सेवक को-ऑप.बँक लि., सातारा , मुख्य कार्यालय, सातारा.
३. **मा.शाखाधिकारी**, दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा **सर्व शाखा.**